दैनिक महाराष्ट्र **सूर्योदय**

www.esuryodaylive.com    Email : dailysuryoday@gmail.com

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती)

कोकण || वर्ष ६ वे || अंक ७५ || शुक्रवार १३ मार्च २०२६ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||




# कर्जत पंचायत समितीच्या सभापतीपदी नमिता सुधाकर घारे तर उपसभापतीपदी चित्राताई ठाकरे बिनविरोध

कर्जत:जयेश जाधव

कर्जत तालुक्यातील जनतेने परिवर्तन विकास आघाडीवर दाखवलेला विश्वास आणि कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमामुळे कर्जत पंचायत समितीवर परिवर्तन विकास आघाडीचा झेंडा फडकला आहे. पंचायत समितीच्या सभापतीपदी नमिता सुधाकर घारे तर उपसभापतीपदी चित्रा ताई जगदीश ठाकरे यांची बिनविरोध निवड झाली असून या निवडीचा ऐतिहासिक सोहळा आणि पदग्रहण समारंभ बुधवार, दि. ११ मार्च २०२६ रोजी कर्जत पंचायत समिती येथे मोठ्या उत्साहात पार पडला.ङ्गङ्गकर्जत पंचायत समितीच्या निवडणुकीत परिवर्तन विकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि इतर मित्र पक्षांनी एकत्रितपणे दैदिप्यमान यश संपादन केले. पंचायत समितीच्या १२ जागांपैकी तब्बल १० जागांवर आघाडीच्या उमेदवारांनी विजय मिळवला, त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ६ तर ठाकरे शिवसेनेचे ४ उमेदवार विजयी झाले. त्यामुळे सभापतीपद राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे तर उपसभापतीपद शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडे देण्याचा निर्णय घेण्यात



आला.ङ्ग या पार्श्वभूमीवर कर्जत पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती निवडीचा आणि पदग्रहणाचा ऐतिहासिक सोहळा मोठ्या जल्लोषात पार पडला. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रायगड जिल्ह्याचे खासदार तथा प्रदेशाध्यक्ष सुनीलजी तटकरे यांनी विशेष उपस्थिती लावून नव्या पदाधिकाऱ्यांना आशीर्वाद दिले.ङ्ग या सोहळ्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष सुधाकर भाऊ घारे तसेच ठाकरे शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख नितीन दादा सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि नेतृत्वाखाली हा भव्य कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले तसेच तालुक्याच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.ङ्ग पदग्रहण समारंभ आणि आनंदोत्सवात आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच कर्जत तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्या नेतृत्वाच्या माध्यमातून कर्जत तालुक्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# दापोली येथे घरगुती गॅस सिलेंडर पुरवठा सुरळीत... मात्र व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा बंद....मेहंदळे गॅस सर्व्हिस

दापोली १२: दापोली तालुक्यातील घरगुती गॅस सिलेंडर चा पुरवठा सुरळीत असून ग्राहकांनी गोंधळून जाऊ नये असे आवाहन गॅस ग्राहकांना दापोली येथील मेहेंदळे गॅस सर्व्हिस चे मुख्य व्यवस्थापक केदार परांजपे यांनी दिल्या आहेत. ङ्ग गॅसच्या साठा व पुरवठा बाबत परांजपे यांनी माहिती देताना सांगितले आहे की, आपल्याकडे गॅसचा तुटवडा नाही.सध्या बाजारपेठेत किंवा पुरवठ्यामध्ये कोणत्याही प्रकारचा गॅस तुटवडा नाही. गॅस सिलेंडरचा साठा पुरेसा उपलब्ध आहे. वितरण व्यवस्था सुरळीतअसल्याची माहितीही त्यांनी दिली.सर्व ग्राहकांना गॅसचे वितरण नेहमीप्रमाणे आणि सुरळीतपणे चालू आहे. प्रत्येक ग्राहकाला त्याच्या गरजेनुसार गॅस सिलिंडर वेळेवर मिळणार असल्याची ग्वाही परांजपे यांनी दिली आहे.ङ्गगॅस घेण्याकरता गर्दी न करण्याबाबत सूचनाङ्गग्राहकांनी घाबरून जाऊन किंवा अफवांवर विश्वास ठेवून गॅस ऑफिसमध्ये अनावश्यक गर्दी करू नये. गर्दी केल्यामुळे वितरण व्यवस्थेवर ताण येतो, तरी कृपया सहकार्य करावे. असे आवाहन त्यांनी केले.ङ्ग ग्राहकांनी आपले बुकिंग ऑनलाइन पद्धतीप्रमाणे नेहमीप्रमाणे सुरू ठेवावे . पहिला सिलेंडर बुकिंग केल्यानंतर तीस दिवसानंतर दुसरा सिलेंडर आणि उज्वला ग्राहक योजनेअंतर्गत असलेल्या ग्राहकांना पहिला सिलेंडर बुक केल्यावर पंचेचाळीस दिवसानंतर दुसरा सिलेंडर मिळेल अशी माहितीही परांजपे यांनी दिली.ङ्ग मात्र व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा बंद झाल्यामुळे फक्त व्यावसायिक सिलेंडर देणे बंद करण्यात आल्याची माहितीही केदार परांजपे यांनी दिली आहे.



# चिपळूण पंचायत समिती नुतन सभापतींचा स्वाभिमानी सेवानिवृत शिक्षक संघटने कडून सत्कार

उपसंपादक प्रदीप पवार

-चिपळूण तालुका स्वाभिमानी सेवानिवृत्त शिक्षक व अधिकारी संघटनेच्या वतीने चिपळूण पंचायत समितीचे नूतन सभापती सूर्यकांतजी खेतले व उपसभापती संदेशजी आयरे यांचा यथोचित सन्मान व सत्कार करण्यात आला. अनेक वर्षानंतर जिल्हा परिषद, पंचायत समितीमध्ये पदाधिकारी कार्यरत झाल्याने सर्वसामान्य नागरिकांची व कर्मचाऱ्यांच्या कामांना गती प्राप्त होईल असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित असलेले नवनिर्वाचित सदस्य शरद शिगवण, शौकत माखजनकर, सुभाष जाधव, गौरव पाटेकर, विनोद झगडे यांचेही अभिनंदन करण्यात आले. या सदिच्छा समारंभासाठी संघटनेचे जिल्हा सरचिटणीस प्रदीप पवार, चिपळूण तालुका अध्यक्ष प्रकाश शिंदे, सरचिटणीस चंद्रकांत जंगम, जिल्हा पदाधिकारी जगदीश कांबळे, संघटनेच्या पदाधिकारी व चिपळूण नगर परिषदेच्या नगरसेविका नसरीन खडस, माजी शिक्षण विस्तार अधिकारी प्रवीण पवार, प्रशांत सुर्वे, रमेश राजेशिर्के, माजी केंद्रीय प्रमुख शैलजा आखाडे, संताजी शिंदे, रामभाऊ लांडे, मधुकर मोहिते तसेच रमेश तांबीटकर, रामकृष्ण कदम, प्रदीप शांताराम पवार, शशिकांत बांद्रे इत्यादी संघटना पदाधिकारी उपस्थित होते.





# सुधागड पंचायत समितीच्या सभापतीपदी जागृती मानकर तर उपसभापतीपदी संदेश शेवाळे यांची वर्णी भा. ज. पा नेते प्रकाश भाऊ, रवी शेठ देशमुख, मिलिंद देशमुख, गीता ताई, आलाप मेहता, अरिप भाई यांच्या हस्ते फुल गुच्छ देऊन शुभेच्छा

रायगड जिल्हा उत्तर उपसंपादक / मंगेश यादव : सुधागड पाली पंचायत समिती सभापती व उपसभापती पदाची निवड आज (दिनांक ११) बुधवार रोजी सुधागड पाली पंचायत समितीच्या नामदेव शेठ खैरे सभागृहात संपन्न झाली. ङ्ग यावेळी सभापती पदासाठी भारतीय जनता पार्टीच्या जागृती मानकर यांनी अर्ज दाखल केला होता तर उपसभापती पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संदेश शेवाळे यांनी अर्ज दाखल केला होता.ङ्ग यावेळी भारतीय जनता पार्टीच्या जागृती मानकर यांची सभापतीपदी तर राष्ट्रवादी काँग्रेसचे संदेश शेवाळे यांची उपसभापतीपदी निवड निर्वाचन अधिकारी यांनी घोषित केली.ङ्ग भारतीय जनता पार्टी राष्ट्रवादी काँग्रेस व रिपाई या महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला. नवनिर्वांचीत पंचायत समितीचे सभापती व उपसभापती यांना शुभेच्छा देण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे नेते प्रकाशभाऊ देसाई मिलिंद देशमुख रवींद्र देशमुख गीताताई पालरेच्या, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ग्रामत्रे सुनील राऊत ललित ठोंबरे सुलतान बेनसेकर दादा कारखाने यांच्या वतीने फुल गुच्छ देऊन शुभेच्छा. या वेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे व इतर घटक पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते ङ्गआदी पदाधिकाऱ्यांसह सर्व संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते..





